चंद्रपूर महासागर



## विजेच्या लपंडावाने ग्रामीण जनता त्रस्त

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर , दि. २० जून :** तालुक्यातील अनेक गावांत मागील आठ दिवसांपुर्वी झालेल्या वादळी पावसाने झाडे कोलमडुन विजेच्या खांबावर पडुन तसेच विजेचे खांब पडल्याने शेतीची विज आठ दिवसांपासुन बंद आहे.

बंद असलेला विज पुरवठा तात्काळ दुरूस्त करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीचे युवा अध्यक्ष शुभम मंडपे व शेतकरी मित्र अध्यक्ष कमलाकर ठाकरे यांनी शंकरपुर येथे कनिष्ठ अभियंता यांचे मार्फत निवेदनाद्वारे केलेली आहे. मागील आठ दिवसांपासुन महावितरण विभागाने गावातील विद्युत पुरवठा सुरळीत सुरू केला.

## दुर्गा माता मंदिर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २० जून :** जागतिक रक्तदान दिनाचे औचित्यावर ऑल इंडिया प्रोफेशनल्स काँग्रेस चंद्रपूर शाखा तथा जिल्हा सामान्य रुग्णालय रक्त संकलन विभागाचे सहयोगाने एक विशेष रक्तदान शिबिराचे आयोजन दुर्गा माता मंदिर, बंगाली कैंप, चंद्रपुर येथे संपन्न झाले. सदर आयोजन स्वर्गीय कु. काजल उत्तम पाल यांचे स्मृती व वाढदिवसाच्या शुभप्रसंगी आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाची शुरुआत स्वर्गीय काजल हिला भावपूर्ण श्रद्धांजलि अर्पण करुन झाली. ६ वर्षाआधी पूर्व बंगाली कैम्प जवळ पश सड़क दुर्घटनेत मौत झाली होती.

# वर्धा नदीकाठच्या गावांना बॅकवॉटरचा धोका

## राष्ट्रीय महामार्गाच्या उंचीमुळे शेती पाण्याखाली येण्याची भीती

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २० जून :** बल्लारशा-राजुरा-लक्कडकोट ते तेलंगणा राज्यसीमेपर्यंत चार पदरी महामार्गाचे काम सुरू आहे. बामणी लक्कडकोट ते राज्यसीमेपर्यंत अंदाजे ३३ किलोमीटर लांबीचा रस्ता, बामणी ते कोरपना आदिलाबाद सीमेपर्यंत जुळणाऱ्या ५६ किलोमीटर लांबीच्या चौपदरी महामार्गाचे काम वेगात सुरू आहे.

सध्या बामणी ते राजुरा महामार्गाचे काम वेगाने सुरू आहे. वर्धा नदीचा भाग सखोल आहे. या भागात पुलाची उंची वाढविण्यात आली आहे. त्याला जोडणाऱ्या रस्त्यांची उंची वाढविण्यात आली आहे. यासाठी महाकाय मातीचे ढिगारे उभे करण्यात आले आहे. त्यामुळे वर्धा नदीकाठावरील गावांना बॅकवॉटरचा फटका बसण्याची शक्यता आहे. वर्धा नदीच्या दोन्ही



किनाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात मातीचे ढिगारे टाकण्यात आले आहेत. पूरपरिस्थितीत नदीचे पाणी नैसर्गिकरित्या वाहून जाण्यासाठी उंच झालेला मार्ग अडथळा ठरण्याची शक्यता आहे. परिणामी बॅक वॉटरचा मोठाधोका परिसरातील गावांवर निर्माण होण्याची शक्यता आहे. स्थानिक शेतकरी आणि नागरिकांनी पूरक्षेत्र भागामधून पुलाची मागणी केली होती. त्यानंतर सर्वेक्षणसुद्धा झाले होते. दरवर्षी वर्धा नदीच्या पुरामुळे नदीकाठच्या गावांना प्रचंड नुकसान सोसावे लागते. या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर कोळसा खाणी आहे.

महामार्गाची उंची वाढली आहे. मातीचे ढिगारे ठिकठिकाणी टाकण्यात आल्याने वर्धा नदी काठावरील गावांना धोका निर्माण झाला आहे. याचा फटका राजुरा शहरासोबत सखल भागांत शेती असलेल्या शेतकऱ्यांना बसणार आहे.

**- मधुकर चौधरी, शेतकरी, राजुरा.**

नदीच्या दोन्ही बाजूला मातीची उंची वाढवल्यामुळे नैसर्गिक नदीच्या प्रवाहाला पावसाळ्यात अडथळा निर्माण झाला आहे. याचा फटका शेती व किनारपट्टीच्या गावांना बसू शकतो.

**- नरेंद्र काकडे. सामाजिक कार्यकर्ते राजुरा.**

महाकाय नैसर्गिक मातीच्या टेकड्या निर्माण झालेल्या आहेत.

## नियमाला बगल देत पर्यटक घोडाझरी तलावात घेतात सेल्फी

### तलावातील पाण्यात उतरून आनंद घेतात याला कोण जबाबदार

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**नागभीड, दि. २० जून :** नागभीड तालुक्यातील घोडाझरी येथे पर्यटक आनंद घेण्यासाठी येतात मात्र सूचनांचे पालन न करता नियमाला बगल देत पर्यटक पाण्यात सेल्फी व पाण्यात उतरून आनंद घेतात मात्र या ठिकाणी कुठे काय आहे याची माहिती नसल्याने मागे पाच युवक पाण्यात बुडून मृत्यू झाला.

यामुळे प्रशासनाने वेळीच दखल घेत फलक लावण्यात आले मात्र सुशिक्षित माणसे नियमाला बगल देत असल्याचे दिसून येत आहे.



तसेच पाच वाजेपर्यंत घोडाझरी पर्यटन स्थळ सोडावे असे आदेश असताना पर्यटक सायंकाळी सहा ते सात वाजेपर्यंत घोडाझरी पर्यटन परिसरात फिरत असतात. वन्य प्राणी यांचा सायंकाळी वावर सुरू होतो अशा वेळेस जंगलातील वन्य प्राणी संघर्ष झाला तर याला कोण जबाबदार आहे अशी चर्चा जनतेमध्ये होत आहे.

जिल्हयात दोन दिवस आलेल्या पावसाने, वारा, वादळाने अनेक गावात शहरात वारा, वादळामुळे वीज पुरवठा खंडित झाला. पावसाने वारा, वादळाने ग्रामीण भागातील मोठे झाडे लाईनवर पडल्याने महावितरणचे एच.टी. पोल १६५, एल.टी. पोल ५४७, एच.टी. लाईन कंडक्टर २० किमी. पर्यंत तुटले, एल.टी. लाईन कंडक्टर ४२ किमी. पर्यंत तुटले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताहांतर्गत आरोग्य शिबिराचे आयोजन

## आमदार किशोर जोरगेवार यांची अधिकाऱ्यांसह नियोजन बैठक

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर,दि. २० जून :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त जुलै महिन्यात आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने सेवा सप्ताह राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून रामबाग मैदानात मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. यासंदर्भात आज आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिकारी आणि डॉक्टरांच्या संघांसोबत नियोजन बैठक घेतली.

या बैठकीस शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे, चंद्रपूर महानगरपालिकेचे आयुक्त विपिन पालीवाल, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. महादेवराव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कराटे, वनविभागाचे सहायक वनसंरक्षक विवेक नाटू,



इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. दीक्षित, आचार्य विनोबा भावे रुग्णालयाचे शिंगणे, ज्युपिटर हॉस्पिटलचे डॉ. स्वप्रिल वावडीकर, नॅशनल कॅन्सर हॉस्पिटलचे डॉ. पवन अगराडे यांच्यासह विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

आमदार किशोर जोरगेवार यांनी सर्व विभागांनी समन्वय साधत काम करावे आणि शिबिरात रुग्णांना उत्तम आरोग्य सेवा मिळेल याची खात्री करावी, असे निर्देश दिले. शिबिराचे स्थळ, सुविधा, आवश्यक वैद्यकीय उपकरणे, औषधे आणि पथकांची रचना याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. गरजू रुग्णांपर्यंत अधिकाधिक आरोग्य सेवा पोहोचवणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या शिबिरासाठी महापालिका आरोग्य विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जिल्हा परिषद आरोग्य विभाग, ज्युपिटर हॉस्पिटल, सावंगी मेघे, कस्तुरबा हॉस्पिटल सेवाग्राम, श्री सनवरलाल जोधपूर हॉस्पिटल, इंडियन मेडिकल असोसिएशन, नॅशनल कॅन्सर हॉस्पिटल यांचे सहकार्य लाभणार आहे. शिबिराआधी रुग्णांची नोंदणी व प्राथमिक तपासणी केली जाणार आहे. गंभीर आजार आढळल्यास शिबिराच्या दिवशी तज्ज्ञ डॉक्टरांकडून सल्ला आणि पुढील उपचार दिले जाणार आहेत. याबबत लवकर आरोग्य शिबिराची तारिख निश्चित करण्यात येईल असे आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.

# जानाळा जंगलात आढळला वाघिणीचा मृतदेह

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २० जून :** आज दिनांक २० जून रोजी एक प्रौढ वाघीण (टी-१७७), वय अंदाजे ७ वर्षे, हिचा मृतदेह मुल वनपरिक्षेत्राच्या कंपार्टमेंट क्रमांक ३६०, बीट डोनी, राउंड जानाळा, ताडोबा बफर विभाग येथे आढळून आला.

सदर घटनेची माहिती मिळताच वनविभागाने तात्काळ कारवाई करत घटनास्थळ सुरक्षित केले व आवश्यक कार्यवाही सुरू केली. मृत वाघिणीचा मृतदेह ट्रांझिट ट्रीटमेंट सेंटर (ऊऊण), चंद्रपूर येथे हलवण्यात आला.

तेथे तपशीलवार शवविच्छेदन करण्यात आले. प्राथमिक अहवालानुसार मृत्यूचे कारण तीव्र हृदय व श्वसन विकृती



(Acute Cardio-Respiratory Failure) असे निदान करण्यात आले आहे. शवविच्छेदनादरम्यान सर्व अवयव दात, नखे, मिशा इत्यादी सुस्थितीत आढळून आले, त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या शिकारीचा अथवा घातपाताचा संशय नाही.

संपूर्ण कार्यवाही राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरण (NTCA) च्या मार्गदर्शक सूचनांनुसार पार पाडण्यात आली.

या वेळी बंडू धोत्रे, प्रतिनिधी, NTCA; मुकेश भांडकर, मानद वन्यजीव रक्षक; एस. एस. डुबे, सहाय्यक वनसंरक्षक, ताडोबा बफर विभाग; डॉ. रवीकांत एस. खोब्रागडे, वन्यजीव पशुवैद्यकीय अधिकारी व प्रमुख, रॅपिड रेस्क्यू टीम, ऊँऊँ; डॉ. कुंदन पोडचेलवार, पशुवैद्यकीय अधिकारी, ऊऊण, चंद्रपूर; डॉ. कडुकर, निवृत्त सहाय्यक पशुवैद्यकीय अधिकारी (ACAH); तसेच श्री. पेंडोर, वनपरिक्षेत्र अधिकारी, मुल आणि मुल रेंज व ताडोबा बफर विभागाचे क्षेत्रीय कर्मचारी उपस्थित होते व त्यांनी संपूर्ण प्रक्रियेमध्ये सहभाग घेतला.

# जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीवर कारवाई करा

## पत्र परिषदेच्या माध्यमातुन ठेका कामगार रोशन हरबडे यांची पोलिसांकडे मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर,दि. २० जून :** कोळसा खाणीत किंवा जवळच्या कंपनीत पुन्हा कामावर घेण्याची मागणीसाठी परिसरातील २०० कंत्राटी कामगार संघर्ष करत आहेत. त्यांनी या संदर्भात आंदोलनही केले. परंतु कामगारांच्या आंदोलनाच्या भीतीमुळे आंदोलनकर्त्यांना अज्ञात फोन नंबरवरून जीवे मारण्याची धमकी दिली जात आहे. या संदर्भात कंत्राटी कामगार रोशन हरबडे यांनी पत्रकार परिषदेद्वारे गडचांदूर पोलिसांकडे जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या अज्ञात व्यक्तीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.



त्यांनी सांगितले की, ते गेल्या दहा वर्षांपासून कोळसा खाणीत कंत्राटी कामगार म्हणून काम करत होते. त्यांचा करार नुकताच संपला आहे आणि ते येणाऱ्यां कंपनीत किंवा परिसरातील इतर कोणत्याही कंपनीत कामावर घेण्याची मागणी करत आहेत. यासाठी त्यांचा संघर्ष सुरूच आहे. दरम्यान १९ जून २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता एका अनोळखी व्यक्तीने अनोळखी नंबरवरून सांगितले की, तू जे करतोयस ते करू नकोस, तुझ्या कुटुंबासोबत आनंदी राहा, तिथून निघून जा, नाहीतर मी तुला इशारा दिला आहे. मी लवकरच तुला त्याचे परिणाम दाखवेन, पोलिसांकडे जा आणि तक्रार दाखल कर, मी माझी शिक्षा भोगून नुकताच परतलो आहे, असे म्हणत त्याने फोन ठेवला.

मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी वेकोली विरोधात निषेध केला आणि नागपूरपर्यंत पैदल निदर्शने केली. तसेच, आम्ही अनुभवी आणि स्थानिक असल्याने वेकोली अंतर्गत परिसरातील काही इतर कंपन्यांमध्ये नोकरी देण्याची मागणी केली. आम्ही संवैधानिक पद्धतीने निषेध करत आहोत. बेरोजगारीने कुटुंबावर संकट ओढवले आहे. रोशन हरबडे यांनी गडचांदूर पोलिसांना पत्राद्वारे जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली आहे.

# उपरी येथे विषमता दलातर्फे संविधान जागरण कार्यक्रम

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**सावली, दि. २० जून :** सावली तालुक्यातील उपरी येथे १९ जुन रोजी हनुमान मंदिर चौकात विषमता निर्मूलन दल मुल सावली तालुका तर्फे संविधान जागर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .

सदर कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून येथिल महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष नागोराव कोठारे , माजी पोलीस पाटील पांडुरंग शेट्ये , माजी पंचायत समिती सदस्य गणपतराव कोठारे , सामाजिक कार्यकर्ते मनीषा अरुण नैताम , संगीता वाघमारे , निखील रायपुरे , आनंद भैसारे , दिलखूष सातपुते , अंकुश मनबततुलवार , विलास मडावी



इत्यादी मान्यवर उपस्थित होते . या मान्यवरांना विषमता दल संस्थे कडून संविधान पुस्तक भेट देण्यात आली .

या कार्यक्रमात व्यासपीठावर उपस्थित तंटामुक्त समितीचे अध्यक्ष नागोराव कोठारे , माजी पंचायत समिती सदस्य गणपतराव कोठारे यांनी उपस्थित नागरिकांना संविधाना बाबत मार्गदर्शन केले . तर प्रमुख मार्गदर्शक हिरालाल भडके यांनी संविधानात दिलेल्या माहितीनुसार नागरिकांनी त्याचा उपयोग करून त्यानुसारच आपले अधिकार व कर्तव्य समजुन घ्यावे अशा प्रकारचे अमूल्य मार्गदर्शन केले . मागील चार वर्षापासून सातत्याने लोकांमध्ये संविधानिक नीतिमता निर्माण व्हावी हा एकमेव दृष्टिकोन पुढे ठेवून विषमता निर्मूलन दलाच्या संयोजक माननीय हिरालाल भडके मुल हे जागर संविधानाचा या कार्यक्रमाचा निरंतर प्रयोग करून खेडेगावातील ग्रामीण भागातील अशिक्षित शिक्षित लोकांना संविधानिक नीतिमत्ता काय आहे त्यांचे संविधानिक अधिकार व कर्तव्य यांची जाणीव करून देत असताना कोणते अधिकार मिळाले कोणते अधिकार मिळायचे राहिले आणि नागरिकांचे कर्तव्य काय हे समजून सांगण्यासाठी प्रयत्न करीत आहेत .

# जावेद पाशा कुरेशी यांच्याविरुद्ध बनावट शालेय पुस्तक व अवमानकारक टिप्पणी प्रकरणी गुन्हा दाखल



**महासागर प्रतिनिधी**

**बल्लारपूर,दि. २० जून :** महाराष्ट्र राज्याच्या शालेय अभ्यासक्रमातील इयत्ता आठवीच्या 'नागरिकशास्त्र' या पुस्तकावर बनावट कव्हर पेज तयार करून त्यावर प्रधानमंत्री नरेंद्रभाई मोदी आणि महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या छायाचित्राचे गैरवापर करून फेसबुक वर अपमानकारक मजकूर प्रसारित केल्याप्रकरणी वरोरा येथील जावेदपाशा कुरेशी यांच्या विरोधात , बल्लारपूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात संबंधित व्यक्तीने सोशल मीडियावर बनावट शैक्षणिक सामग्री प्रसारित करून दिशाभूल करणारी माहिती आणि शासकीय संस्थांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न केला. यावर भाजपचे काशिनाथ सिंह, समीर केने, मनीष पांडे, निलेश खरबडे, देवानंद वाटकर, सतीश कमकम, महेंद्र ढोके, रिंकू गुप्ता, पवन द्विवेदी यांच्या प्राप्त तक्रारीवरून पोलिसांनी दिनांक १९/६/२५ रोजी भारतीय न्याय संहिता २०२३ ३५६(२) व माहिती तंत्रज्ञान अधिनियम २०००-६६ऊ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# निर्वेद सामाजिक संस्थेचा प्रेरणादायी उपक्रम

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २० जून :** चुनाळा येथील गो-विज्ञान केंद्रात निर्वेद बहुउद्देशीय सामाजिक संस्था राजुरा चे वतीने विविध क्षेत्रातील प्राविण्यप्राप्तांचे सत्कार व कौतुक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले, अध्यक्षस्थानी संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप म्हैसणे चुनाळा होते तर प्रमुख अतिथी म्हणून श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे प्रचारक ॲड.राजेंद्र जेनेकर,रेल्वेस्टेशन मास्टर रंगारी,रमेशजी सूर,लटारु मत्ते प्रचारक, रविशंकर गायकवाड,सुभाष साळवे ग्रामगीता परिक्षा ताल्ुकाप्रम्ुख,संस्थाध्यक्ष



सतिश सूर,नंदकिशोर कल्लूरवार यांची उपस्थिती होती,सर्वप्रथम पाहुण्यांचे हस्ते श्रीगुरुदेव अधिष्ठाण व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रतिमेचे पुजन व माल्यार्पण करण्यात आले,याप्रसंगी स्पर्धा परिक्षेतून पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झालेले धनराज हिंगाणे,मट्रिक मध्ये राजुरा तालुक्यातून ९७ टक्के गुण घेवून प्रथम आलेला सक्षम रंगारी, एमबिबीएस करीता निवड झालेली दिशा रंगारी, चंद्रपूर न्यायालयात लिपीक म्हणून निवड झालेले राजु झाडे व पुणे येथे झालेल्या नॅशनल ब्लॅकबेल्ट कराटे चांम्पीयनशिप मधून कास्यपदक विजेती प्रगती राजेंद्र जेनेकर,पोलीस म्हणून निवड झालेले अमर पिदूरकर व गजानन पोले या प्राविण्यप्राप्तांचा सन्मानपत्र,शाल-स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला,

# आर के मदानी कंपनीने टाकली शेतात फ्लाय अॅश, शेतकऱ्याचे नुकसान



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. २० जून :** तालुक्यातील विजासन मार्गावर रेल्वे पुलाचे बांधकाम सुरू आहे, या बांधकामासाठी फ्लाय ॲशचा वापर केला जात आहे. त्याकरता याची साठवणूक करण्यासाठी शेतातील काम करणाऱ्या जागेवर आर .के. मदानी या कंपनीने फ्लाय ॲश टाकल्याने येथील शेतकरी विजय मत्ते यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे .विजासन येथील हनुमान मंडळाची शेती एका वर्षासाठी मत्ते यांनी केली असून तिथे शेतीचे काम चालू केले आहे. या शेतीच्या काही अंतरावर विजासन रेल्वे पुलाचे बांधकाम सुरू आहे. या बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात फ्लाय ॲश चा वापर केला जात आहे . या ॲश मुळे शेतीच्या नापिकी होते. याची माहिती असून सुद्धा या कंत्राटदाराने मुजोरगिरीने त्यांच्या शेतात संपूर्ण फ्लाय ॲश टाकली आहे. त्यामुळे त्यांची संपूर्ण शेतीची कामे खोडंबली आहे. या प्रकाराबाबत विजय मत्ते यांनी जाब विचारला असता , त्यांनाच दम देण्याचा प्रकार केला असल्याच विजय मते यांनी सांगितले. या मदानी कंपनीने शेतीची नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकरी विजय मत्ते यांनी केली आहे .

# गांधी चौकात विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. २० जून :** लोकसभेचे विरोधीपक्ष नेते खासदार राहुल गांधी यांचा वाढदिवस घुग्घूस शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने शहरातील गांधी चौक येथे काँग्रेस अध्यक्ष राजुरेड्डी व पदाधिकाऱ्यांनी केक कापून उत्साहात साजरा केला.

यानिमित्त ज्येष्ठ काँग्रेस नेते लक्ष्मण सादलावार, सैय्यद अनवर, ज्येष्ठ नेते शामराव बोबडे, जिल्हा महासचिव अलीम शेख, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष रोशन दंतलवार, तालुका उपाध्यक्ष श्रीनिवास गुडला, युवक काँग्रेस जिल्हा महासचिव सुरज कन्नूर, इंटक जिल्हा उपाध्यक्ष शहजाद शेख, ज्येष्ठ नेते शेखर तंगडापेल्ली, ज्येष्ठ नेते शेख शमिउद्दीन, ज्येष्ठ नेते



सत्यनारायण डकरे, विजय माटला, रोहित डाकूर, दिपक पेंदोर, सुनिल पाटील, अरविंद चहांदे, थॉमस अर्नाकोडा, कपिल गोगला, सुरज मिश्रा, अजय त्रिवेणी, शहंशाह शेख, गणपत लभाने, अंकुश सपाटे, इप्पा मारय्या महिला काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष यास्मिन सैय्यद, महिला शहर अध्यक्ष संगीता बोबडे, जिल्हा महासचिव पदमा त्रिवेणी, जिल्हा सचिव दुर्गा पाटील, मंगला बुरांडे, जिल्हा महासचिव पुष्पा नक्षीने, संध्या मंडल, शिल्पा गोहील, सविता कोवे, वंदना क्षीरसागर, नंदा पचारे, जोया शेख, नानी बाई क्षीरसागर,

अश्विनी धुर्वे, वर्षा पाटील, राबिया शेख, शिलाताई धोबे, सविता कोवे, रेखा रेगुंडवार, कौशल्या माणुसमारे, सुनीता श्रीवास्कर, लक्ष्मीबाई गोदारी, गुलशन शेख, सुनंदा नांदे, कामिनाताई वैद्य, सुशीला तुराणकर, सिमा उमाटे, वंदना उमाटे, प्रतिभा वासेकर, वृंदा हनुवंते, सुनीता हिवरकर, विद्या चौधरी, अविना कामातवार, गंगाबाई पचारे, विमलाबाई चौधरी, बडू रोहणकर, बुधम्मा इरला, ओडेक्का कासु, सुगना डोमा, पोसूबाई गोदारी, सररू बाई गोदारी, ईश्वर अक्का, सरोजा ढोके, शारदा अक्का, व मोठ्या संख्येने काँग्रेस पदाधिकारी व सदस्यगन उपस्थित होते

# आदिवासी बांधवांसाठी लोहारा येथे पार पडले शिबिर



**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. २० जून :** लोहारा येथील जिल्हा परिषद शाळेत धरती आबा उन्नत ग्राम योजना , पी एम जनमन योजने अंतर्गत आदिवासी बांधवांकरिता एका शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

त्याअंतर्गत आदिवासी लाभार्थ्यांना जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, राशन कार्ड, जनधन बँक खाते, आयुष्यमान भारत कार्ड, पी एम किसान कार्ड, प्रधानमंत्री आवास योजना, सिकलसेल ॲनिमिया आरोग्य तपासणी, नवीन विद्युत जोडणी आदिं सेवा सदरहू शिबिरात उपलब्ध करून देण्यात आल्या.

या आयोजित शिबिराला चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी सी , मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग , उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार , गटविकास अधिकारी श्रीमती भांगरे , नायब तहसीलदार खंडारे , एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चंद्रपूर प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार , सहाय्यक प्रकल्प अधिकारी गिरीष पोळ , आदिवासी विकास निरीक्षक अनिल कुंटेवार, सरपंच किरण चालखुरे, उपसरपंच शालिक मरसकोल्हे, मुख्याध्यापिका शीला धुळे तसेच विविध विभागांचे अधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते.

## केंद्राच्या योजनांचा घेतला आढावा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २० जून :** केंद्र सरकारच्या अखत्यारीत येत असलेले विषय तसेच केंद्राच्या योजनांची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) कार्यरत आहे. या समितीच्या कामाच्या प्रगतीचा आढावा खासदार धानोरकर यांनी आज (दि. १६) घेतला. नियोजन सभागृह येथे पार पडलेल्या या बैठकीला दिशा समितीचे सहअध्यक्ष खा. डॉ. नामदेव किरसान, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, मनपा आयुक्त विपीन पालीवाल उपस्थित होते.

## शिष्यवृत्ती करीता अर्ज आमंत्रित

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २० जून :** सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात इ. १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय व अभियांत्रिकी इ. अभ्यासक्रमांमध्ये सरासरी ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त टक्केवारीने गुण प्राप्त करून उत्तीर्ण झालेल्या मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यांकडून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्तीकरीता अर्ज मागविण्यात येत आहे.मांग, मातंग, मिनिमादीग, मादींग, दानखनीमांग, मांगमहाशी, मदारी, राधेमांग, मांगगारूडी, मांगगारोडी. मादगी, मादीगा या जातीतील विद्यार्थी - विद्यार्थींना महामंडळाकडुन जेष्ठता व गुण क्रमांकानुसार जिल्ह्यातील पहिले तीन किंवा पाच विद्यार्थ्यांस उपलब्ध निधीच्या अधिन राहून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळातुन शिष्यवृत्ती मंजुर करण्यात येते.

# मतदार यादी नाव नोंदणी व दुरुस्ती मोहीमेत राजकीय पक्षांनी जनजागृतीसाठी सहकार्य करावे - आयुक्त विपिन पालीवाल

## निवडणुक कार्यक्रमात राजकीय पक्षांचे सहकार्य महत्वाचे - निवडणुक निर्णय अधिकारी संजय पवार

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २० जून :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाची तयारी सुरु झाली असुन प्रभाग रचना आदेश तसेच मतदार यादी अद्ययावतीकरण मोहिमेसंदर्भात राजकीय पक्षांची संयुक्त बैठक गुरुवार (१९ जून) रोजी चंद्रपूर मनपा राणी हिराई सभागृहात घेण्यात आली.




आगामी निवडणुकांमध्ये वयाचे १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या सर्व पात्र मतदारास मतदार यादीत आपले नाव नोंदविणे शक्य व्हावे,सर्व पात्र मतदारांना मतदान करता येऊन मतदानाचे प्रमाण वाढावे यादृष्टीने केल्या जाणाऱ्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. याप्रसंगी निवडणुक निर्णय अधिकारी ७१ - चंद्रपूर विधानसभा क्षेत्र तथा उपविभागीय दंडाधिकारी संजय पवार, सहा. निवडणुक निर्णय अधिकारी ७१ - चंद्रपूर विधानसभा क्षेत्र तथा तालुका दंडाधिकारी विजय पवार,मनपा आयुक्त विपीन पालीवाल,उपायुक्त मंगेश खवले, उपायुक्त संदीप चिद्रावार तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

आगामी निवडणुकीसाठी प्रशासनातर्फे तयारी पुर्ण केली जात आहे. या बैठकीत शासनाकडून निर्गमित प्रभाग रचना आदेशावर सविस्तर करण्यात आली. नव्याने प्रस्तावित प्रभागांची माहिती, मार्गदर्शन तसेच नागरिकांपर्यंत योग्य माहिती पोहोचवण्यासाठी नियोजन या विषयांवर चर्चा झाली.

प्रशासनामार्फत मतदार जनजागृती व्यापक प्रमाणात होणार असुन येत्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमानुसार मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करणे, मतदारांची नावे वगळणे, स्थानांतर करणे तसेच नावात दुरुस्ती करण्याची संधी मिळणार आहे. या विशेष मोहिमेमध्ये सर्वांनी सहभागी व्हावे व उपलब्ध संधीचा फायदा घेण्याचे आवाहन आयुक्त विपीन पालीवाल यांनी केले.

निवडणुक निर्णय अधिकारी संजय पवार यांनी सांगितले की, ‘मतदार यादी अद्ययावतीकरण ही लोकशाहीची मूलभूत प्रक्रिया आहे. सर्व पात्र नागरिकांनी आपली नोंदणी करून लोकशाही हक्क बजावणे आवश्यक आहे. या प्रक्रियेस जनजागृतीसाठी सर्व पक्षांनी सक्रीय सहभाग द्यावा.’ बैठकीदरम्यान सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी पारदर्शक, सुसूत्र व शांततेपूर्ण निवडणूक प्रक्रियेसाठी प्रशासनास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

## सरपंच पदाची सोडत नव्याने काढा - सचिन राजुरकर



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २० जून :** ग्रामपंचायत निवडणुकीत सरपंच पदासाठी नव्याने सोडत काढून २७ टक्के आरक्षण द्यावे अशी मागणी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजुरकर यांनी आज दिनांक २० जून २०२५ ला मुख्यमंत्री , ग्रामविकास मंत्री आणि मुख्य निवडणुक अधिकारी यांचे कडे आज चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणूक अधिकारी चौधरी यांचे कडे निवेदन देऊन केली आहे.

४ एप्रिल २०२५ अन्वे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ३० व मुंबई ग्रामपंचायत सरपंच निवडणूक नियम १९६४ मधील नियम पोट नियम (३), (४ ),(५ ),व (६ )मधील तरतूद नुसार अनुसूचित जाती /जमाती, नागरिकाचा मागास प्रवर्ग व स्त्री प्रवर्गातील सरपंच पदे तसेच सर्वसाधारण जागा व स्त्री यासाठी आरक्षित करायची पदाची कारवाई ग्रामविकास विभागाने मार्च २०२५ ला सरपंच पदाची आरक्षणाची सोडत काढण्यात आली होती,आणि चंद्रपूर जिल्ह्यात २३ एप्रिल २०२५ ला चंद्रपूर जिल्ह्यात एकूण ९२ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाच्या सोडत काढल्या होत्या, त्यात चिमूर तालुक्यात नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी एकही सरपंच पद राखीव ठेवण्यात आले नाही. दिनांक ६ मे २०२५ ला माननीय सवीच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थेतील आरक्षण २७ टक्के मान्य केले असल्याने ,महाराष्ट्रातील आणि चंद्रपूर जिल्ह्यातील दिनांक २३ एप्रिल २०२५ ला काढलेली सरपंच पदाची आरक्षण सोडत रद्द करून नव्याने आरक्षण करण्यात यावे, या साठी निवेदन देण्यात आले या वेळी महाराष्ट्र सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष नंदूकिशोर वाढई, ॲड देवा पाचभाई, सरपंच्या इंदुबाई पोले ,स्नेहा साव संध्याताई पाटील ,नर्मदा बोरेकर निर्मला दडमड , सोनाबाई हनवते मंगला कलेवाड इत्यादी सरपंच आणि दीपक पिंपळशेंडे, वैभव क्षीरसागर सुरज देवाडकर ,संतोष झाडे,उपस्थित होते

### स्थानिक स्वराज्य संस्था आणि पालिका निवडणूक, इच्छुक उमेदवारांची चाचपणी

## काँग्रेस, शेतकरी संघटना, आणि भाजप मध्ये त्रिकोणी लढतीचे संकेत



आमचा पक्ष स्वबळावर निवडणूक करिता सज्ज असून आगामी निवडणुकीत राजुरा विधानसभाचा विकासा करिता विधानसभातील जनता शंभर टक्के भाजपाला विजय करणार अशी प्रतिक्रिया आमदार देवराव भोंगळे यांनी दिली.



काँग्रेस आणि भाजप सोडून इतर समविचारी पक्षांसोबत युती करण्यास तयार आहे अशी प्रतिक्रिया शेतकरी संघटनेचे नेते वामनराव चटप यांनी दिली.



आगामी निवडनूका आमचा पक्ष स्वबळावर लढण्यास तयार असून जर एखादा समविचारी पक्ष आमच्या सोबत येण्यास तयार असेल तर आम्ही त्या पक्षांसोबत युती करण्यास तयार आहोत.

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २० जून :** पावसाळ्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्था व नगरपालिका निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे.त्याकरिता सर्वच पक्षाचे नेते मंडळी इच्छुक उमेदवारांचे चाचपणी सुरु केल्याचे दिसून येत आहे. तसेच इच्छुक उमेदवार नेते मंडळीचा घरी चकरा मारत आहे. आगामी स्थानिक स्वराज संस्था आणि पालिका निवडणूक सर्वच पक्षातील प्रमुख नेते मंडळींनी स्वबळावर निवडणूक लढण्यास तयार असून आगामी स्थानिक स्वराज संस्था आणि पालिका निवडणूक त्रिकोणी मुकाबला होण्याच्या वाटेवार जातं असल्याचे संकेत मिळत आहे.

सर्वच पक्षातील प्रमुख नेत्यांनी आगामी स्थानिक स्वराज संस्था आणि पालिका निवडणूक स्वबळावर लढण्याचे संकेत दिले आहे.

पूर्वीच खुद्द वामनराव चटप यानी येत्या स्थानिक स्वराज संस्थेमध्ये आमचा पक्ष भाजप आणि काँग्रेस सोबत युती करणार नाही अशी घोषणा दिली होती तर आमदार देवराव भोंगळे यांनी म्हटले कि, संपूर्ण राजुरा विधानसभा क्षेत्रात भाजप करिता अनुकूल वातावरण आहे. आमच्या पक्षात काँग्रेस आणि शेतकरी संघटनेचे नेते व कार्यकर्ते येत असल्यामुळे आमचा पक्ष मजबूत होत आहे. तर काँग्रेस चे जेष्ठ नेते अरुण धोटे यांनी म्हटले कि आमचा पक्ष स्वबळावर निवडणूक लढण्यास तयार असून त्याकरिता काँग्रेस नेते मंडळी आणि कार्यकर्ता सोबत बैठका सुरू आहे जर समविचारी पक्ष आमच्या सोबत युती करण्यास तयार असेल तर आम्ही युतीसाठी तयार आहोत अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

एकंदरी काँग्रेस शेतकरी संघटना आणि भाजप हे स्वबळावर लढण्याची तयारी दाखवली असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि नगरपालिका निवडणुका मुकाबला होण्याची संकेत मिळत आहे.

## आसोला मेंढा कालव्यावरील बंद नलिकेचे अपूर्ण काम भोवले ; पीवीआर कंपनीला ४१ कोटींचा दंड

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**सावली, दि. २० जून :** आसोलामेंढा कालव्यावरील बंदनिलकेचे काम न केल्यामुळे मे.पी.वी.आर.कंस्ट्रक्शन कंपनीला प्रतिदिन दहा लाख, याप्रमाणे आजपर्यंत ४१ कोटींचा दंड ठोठावण्यात आला.दंडाची रक्कम सुरक्षा रकमेपेक्षा जास्त होते, तेव्हा नियमाप्रमाणे करारनामा रद्द करून नवीन निविदा काढून काम करून घेण्याची जबाबदारी संबधित विभागाची असते.

या प्रकरणात दंडाची रक्कम करारनामा किंमतीच्या जवळपास ५० टक्के होऊनही करारनामा रद्द करून नवीन निविदा काढली जात नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. याप्रकरणी ३५ शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गोसेखुर्द प्रकल्पाचे अधीक्षक अभियंता राजेश पाटील यांच्या विरोधात तक्रार केली आहे.पाटील हेतू परस्सर करारनामा रद्द करीत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

आंध्र प्रदेशातील नेल्लोर येथील पोयुगुंटा श्रीधर यांच्या मे.पी.वी.आर.कंस्ट्रक्शन कंपनीला गोसेखुर्दच्या आसोलामेंढा प्रकल्पाच्या मुख्य कालव्यावरील येरगाव,खेडी,भेजगाव वितरिका व बाबराळा,गडीसूरला,बेंबाळ चक,सावली क्र.९, १०, ११, ११ (अ) या लघु कालव्यांचे बांधकाम बंदनलिका वितरण प्रणालीने ४,४०६ हेक्टर लागवडी योग्य क्षेत्रावर सिंचन सुविधा उपलब्ध करून ५,७७६ हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती करण्याचे काम देण्यात आले. ऑक्टोबर २०१८ पासून सुरू झालेले हे काम आठ वर्षे लोटल्यानंतरही पूर्ण झालेले नाही. अर्धवट कामामुळे या भागातील शेतकऱ्यांना सिंचनाशी संबंधित मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर विपरित होत आहे. यामुळे कालव्याचे काम तत्काळ पूर्ण करावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी आसोलामेंढा प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे सातत्याने केली.कंत्राटदारानेच काम पूर्ण केले नाही. यामुळे कंपनीला मार्च २०२४ पासून प्रतिदिन दहा लाख याप्रमाणे दंड आकारणे सुरू असल्याचे शेतकऱ्यांना सांगण्यात आले.

आजपर्यंत या कंपनीला ४१ कोटींचा दंड ठोठावण्यात आला. दंडाची रक्कम सुरक्षा रकमेपेक्षा अधिक होते तेव्हा नियमाप्रमाणे करारनामा रद्द करून नवीन निविदा काढावी लागते. मात्र त्याचीही प्रक्रिया अतिशय कासवगतीने सुरू आहे. कार्यकारी अभियंत्यांनी निविदेतील कलम ३ (क) नुसार निविदा रद्द करण्याचा प्रस्ताव मंडळ कार्यालयाकडे सादर केला. परंतु अधीक्षक अभियंता कार्यवाही करत नाही. त्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया थांबली आहे.

**ब्रम्हपुरी, :** तालुक्यांतील बेलदाटी शेत शिवारात नाल्यावर शेतकऱ्यांना जाण्या-येण्याकरीताव शेतीला पाणी देण्याकरीता पाणी अडवून ठेवण्याकरीता मृद संधारण विभाग ब्रम्हपुरी अंतर्गत दिड वर्षापूर्वी बंधारा बांधुन त्यात ४९ नग लोखंडी प्लेटा लावलेल्या होत्या. त्यापैकी ३० नग लोखंडी प्लेटा किं. ६०,००० रुपयाचा कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्या. यावरुन गुन्हा दाखल केला.

**सावली, दि. २० जून :** सावली वनपरिक्षेत्रात वाघ, बिबट, अस्वल, रानटी डुक्कर व जंगली हत्तींचा सतत धुमाकूळ असल्याने वारंवार मानव वन्यजीव संघर्षाची घटना घडत आहेत. त्यामुळे सावली वनपरक्षत्रातील संपूर्ण वन कर्मचारी २४७ याप्रमाणे वन्यप्राणी बंदोबस्त, अवैध वृक्षतोड, अवैध शिकार, वनवनवा, अवैध अतिक्रमण, अवैध उत्खनन, अवैध चराई , तसेच कार्यआयोजना व रोपवन आणि जलमृद संधारणाची कामे, न्यायालयीन कामे शेती व पशुधन हानी नुकसान भरपाई देण्याचे कामात सतत व्यस्त असताना वेळेचे बंधन नाही.

## आशा वर्कर मृत्यू प्रकरण सखोल चौकशी करून दोषीवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करा

### आशा स्वयंसेविकांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**नागभीड, दि. २० जून :** नवेगाव पांडव प्राथमिक आरोग्य केंद्राशी संलग्न असलेल्या आशा वर्कर पुष्पा हरिदास मरघडे यांचा ब्रेन हॅमरेजने मृत्यू झाला. या मृत्यूला नवेगाव पांडव येथील वरिष्ट अधिकारी व कर्मचारी यांचा असलेला मानसिक त्रास कारणीभूत असून त्यांची सखोल चौकशी करून या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी आशा स्वयंसेविकासाठी कार्य करणाऱ्या आयटक संघटनेच्या माध्यमातून आयोजित पत्रकार परिषदेमध्ये करण्यात आली.

पुष्पा मरघडे या आशा म्हणून कार्यरत होत्या व त्या सध्या कुटुंब सर्वेक्षणाचे काम करीत होत्या. शासनाकडून जे उपक्रम येत होते त्यात त्या सहभागी होऊन काम करीत होत्या.गेल्या सहा महिन्यांपासून मानधन झाले नसतांनाही सर्व आशा या कार्यरत आहेत.असे असतानाही अनेक आशा वर्करला नवेगाव पांडव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व आशा सुपरवायझर या मानसिक त्रास देतात. तसेच वारंवार राजीनामा देण्याची धमकी देतात. पगारात मोठ्या प्रमाणात कपात करीत असतात. मानधन तत्वावर असलेल्या आशाना कारणे दाखवा नोटीस देतात. तसेच कुठे बाहेर गावी जायचे असल्याससुद्धा विना परवानगीने जाऊ देत नाही. त्यासाठी अर्ज करावा



लागत असल्याची माहिती पत्रकार परिषदेत दिल्या गेली. पुष्पा मरघडे यांना मासिक मीटिंगमध्ये उभे करून तुमच्यामुळे मला जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या समोर उभे राहावे लागते, तुम्ही काम करू शकत नाही तर राजीनामा द्या, पगार फुकटचा घेता का अशापद्धतीचे बोलणे नेहमी असायचे. तसेच या केंद्राच्या परिचारिकासुद्धा त्यांची लाज वेळोवेळी काढत असल्याने पुष्पा मरघडे यांनी मनावर घेतल्याने त्यांचा ब्रेन हॅमरेजमुळे मृत्यू झाला असा आरोप करीत, याला कारणीभूत असलेल्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची चौकशी करून दोषींवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी आयटक माध्यमातून अशांच्या वतीने करण्यात आलेली आहे. तसेच सदर सर्व आशांनी चिमूर विधानसभेचे आमदार बंटीभाऊ भांगडिया यांची सुद्धा भेट घेतली असून त्यांना सुद्धा सदर घटनेची चौकशी करून न्याय देण्याची मागणी केली आहे. आमदार महोदयांनी सर्व आशांचे म्हणणे ऐकूण घेत या घटनेची चौकशी करण्याचे आश्वासन दिले. या घटनेच्या संदर्भात उद्या चंद्रपूर येथे धडक मोर्चा सुद्धा काढण्यात येणार आहे.

## आमदार अडबाले यांनी प्रकल्प कार्यालयातील अधिकाऱ्यांना धरले धारेवर

### आदिवासी आश्रमशाळा शिक्षक - कर्मचाऱ्यांच्या समस्या निवारणार्थ सभा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २० जून :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय चंद्रपूर येथील अधिकारी - कर्मचारी आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या प्रलंबित ठेवत असल्याने समस्या निवारण सभेत आमदार सुधाकर अडबाले यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. प्रलंबित समस्या दिलेल्या वेळेत सोडविण्याचे निर्देश देखील सभेत आमदार अडबाले यांनी दिले.



विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचा ‘समस्या तुमच्या, पुढाकार आमचा’ या उपक्रमा अंतर्गत विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने चंद्रपूर प्रकल्पांतर्गत अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्यांबाबत समस्या निवारण सभा नुकतीच पार पडली.

आदिवासी आश्रमशाळा माध्यमिक शिक्षकांना ४८०० ग्रेड पे नुसार वेतन निश्चीती केल्यानंतरही सुधारित वेतन निश्चीती लागू केली नसल्याने सभेत लेखाधिकारी यांना आमदार सुधाकर अडबाले यांनी धारेवर धरले. वर्ष होऊनही देखील सदर प्रकरण निकाली न काढल्याने सदर मुद्दा सभेत चांगलाच गाजला. तसेच प्राथमिक शिक्षकांना ४३०० सुधारित वेतन निश्चीती लागू करावी. सदर प्रकरण ११ जुलै २०२५ पर्यंत निकाली काढण्याचे निर्देश आमदार सुधाकर अडबाले यांनी अधिकाऱ्यांना दिले.

शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या जीपीएफ - एनपीएस २०२३-२४, २०२४-२५ पर्यंतच्या पावत्या ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत द्याव्या. दरमहा १ तारखेला वेतन अदा करण्याबाबत सभेत ठरलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही करावी व प्रलंबित सामुहीक, वैयक्तिक समस्यांवर चर्चा करून समस्या तात्काळ निकाली काढण्याच्या सूचना आमदार सुधाकर अडबाले यांनी प्रकल्प कार्यालयातील प्रकल्प अधिकारी, लेखाधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या.

सभेला प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार, सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री. टिंगूसले, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे महानगर अध्यक्ष दिगांबर कुरेकार, माजी जिल्हाध्यक्ष केशवराव ठाकरे, माजी जिल्हा कार्यवाह श्रीहरी शेंडे, सिटू संघटनेचे विभागीय अध्यक्ष रामदास खवशी, अनुदानित / शासकीय आदिवासी आश्रमशाळा संघटना चंद्रपूरचे अध्यक्ष प्रमोद साळवे, सचिव मनोज आत्राम, कार्याध्यक्ष चंद्रभान वरारकर, सदस्य बजरंग जेणेकर, महेश ताजणे, सुरेश वरारकर, गोपाल बोबाटे, युवराज मेश्राम, विलास चुदरी, छाया मोहीतकर, कु. जे.डी. राऊत, सुधाकर वाढोरे, श्री. काकडे, श्री. पिंपळशेंडे, श्री. खोब्रागडे, श्री. धानोरकर, श्री. बोधलकर, श्री. कसारे, श्री. कडू व इतर आश्रमशाळा पदाधिकारी, समस्याग्रस्त शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## २१ जून रोजी पालकमंत्री चंद्रपुरात

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २० जून :** राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके हे २१ जून रोजी चंद्रपूर येथे येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. २१ जून रोजी सकाळी ६.१० वाजता वन अकादमी येथून जिल्हा क्रीडा संकूलकडे प्रयाण, सकाळी ६.३० ते ८.३० वाजता बॅडमिंटन हॉल येथे आंतराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमाला उपस्थिती, सकाळी ९.३० वाजता सुजल प्रकाश गेडाम या विद्यार्थ्याचा सत्कार, सकाळी १०.३० वाजता नियोजन भवन येथे महसूल विभागाच्या सहा वाहनांचे लोकापर्ण कार्यक्रमास उपस्थिती, दुपारी १२.३० वाजता चंद्रपूरवरून यवतमाळकडे प्रयाण.

## २१ जुनला आयआयए चंद्रपूर उपकेंद्र कार्यकारी मंडळाचे उद्घाटन

### पत्रपरिषदेत आयआयए उपकेंद्राचे सचिव वसीम शेखची माहीती

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २० जून :** वास्तुकलेतील उत्कृष्टता आणि व्यावसायिक विकासाला चालना देण्यासाठी चंद्रपूर शहरातील इंडियन इन्स्टिटयुट आफ आर्किटेक्टस अर्थात आयआयए चंद्रपूर उपकेंद्राच्या नवीन कार्यकारी समितीचे उद्घाटन २१ जून रोजी सायंकाळी ६.३० वाजता एनडी हॉटेलमध्ये होणार असल्याची माहिती उपकेंद्र समितीचे सचिव वसीम शेख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्स म्हणजेच आयआयए ची स्थापना १९१७ मध्ये झाली. ही एक प्रमुख राष्ट्रीय संस्था आहे. जी वास्तुकलेतील उत्कृष्टता आणि व्यावसायिक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी समर्पित आहे. चंद्रपूर उपकेंद्र प्रथमच चंद्रपूरमध्ये स्थापन होणार आहे. या उपकेंद्राच्या नवीन




कार्यकारी समितीचे उद्घाटन २१ जून रोजी होणार आहे.

यावेळी उद्घाटन आयआयए नॅशनल कौन्सिल पुणेचे सहसचिव संदीप बावडेकर, आयआयए महाराष्ट्रचे अध्यक्ष संदीप प्रभू, सुनील भाले, रविराज सरवटे, आयआयए महाराष्ट्र चॅप्टरचे कोषाध्यक्ष शेखर बागोल, उपेंद्र पंडित, प्रियदर्शन नागपूरकर यांच्या हस्ते होणार आहे.

आयआयए चंद्रपूर उपकेंद्राच्या अध्यक्षपदी वैभव सहरकर, उपाध्यक्षपदी सचिन चिंतावार, सचिवपदी वसीम शेख, कोषाध्यक्षपदी परिणीता मेश्राम, माजी सदस्य रवी पचारे, आनंद मुंधडा, तेजस काळसकर, स्पर्श काळडा, दिलीप जांगीड, शिल्पा हसनी, शिवानी निंबाळकर यांची निवड करण्यात येणर आहे.

पत्रकार परिषदेत वैभव सहरकर, सचिन चिंतावार, वसीम शेख, परिणीता मेश्राम, दिलीप जानवे, शिवानी निंबाळकर, स्पर्श कालडा आदी उपस्थित होते.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

